# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## प्रमोदजी महाजन स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र चालविणेस देणेकरिता

## अटी शर्ती

१) प्रस्ताव सादर करणारी संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम अथवा सार्वजनिक न्यास अधिनियम या अंतर्गत नोंदणीकृत असावी.

२) संस्थेला पॅन नंबर असणे आवश्यक आहे. त्याची छायांकित प्रत सादर करावी.

३) प्रति वार्षिक भाडे किमान रु.६,००,०००/- दयावे लागेल.

४) निवड केलेल्या पात्र संस्थेला रु.१,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) अनामत रक्कम भरुन अटी शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

५) सदरचे केंद्र चालविणा-या संस्थेस महानगरपालिका कराराच्या दिवशी केंद्रात उपलब्ध असलेले फर्निचर, लाईट फिटींग दिवे व पंखे, वापरण्याच्या पाण्याकरिता इलेक्ट्रिक मोटर, केंद्रात उपलब्ध असलेले पुस्तके इत्यादी साहित्य महानगरपालिका उपलब्ध करुन देईल.

६) केंद्राकरिता कर्मचारी वर्ग, लाईटचे बील, फोन व फोन बील, इंटरनेट व केंद्र चालविण्याकरिता येणारा सर्व संचालन खर्च संस्थेला करावा लागेल.

७) केंद्रामध्ये विदयार्थ्यांना दरवर्षी प्रवेश परिक्षेद्वारे गुणानुक्रमे प्रवेश देण्यात यावा. १ वर्षानंतर विदयार्थ्याचा प्रवेश संपुष्टात येईल. परंतु असा विदयार्थी प्रवेश परिक्षेस पुन्हा बसण्यास पात्र राहील. प्रवेश परिक्षेकरिता संस्था विदयार्थ्यांकडून शुल्क आकारु शकेल.

८) या केंद्रात प्रवेश घेण्यासाठी अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात रहिवासी असल्याचा पुरावा म्हणून विदयार्थ्याने त्याचे आधारकार्ड अथवा मतदान कार्डची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल.

९) सदरचे केंद्र चालविणेकरीता निवड झाल्यास रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर ५ वर्षाकरिता अटी व शर्तीनुसार केंद्र चालविण्याचा करारनामा करावा लागेल.

१०) अटी शर्तीचा भंग झाल्यास, संस्थेचे इमारतीचे अथवा महानगरपालिकेच्या अन्य मालमत्तेचे व हिताचे नुकसान झाल्यास संस्थेचा करार रद्द करण्याचा व डिपॉझीट रक्कम जप्त करणेचा अधिकार अहमदनगर महानगरपालिकेस राहील. इमारतीमध्ये कोणताही फेरबदल करावयाचा झाल्यास महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल. त्याचप्रमाणे इमारतीमध्ये महानगरपालिका स्वतःच्या इच्छेने फेरबदल करु शकेल. केंद्राचे इमारतीचा कोणताही भाग परस्पर भाडयाने अन्य व्यक्तीस वा संस्थेस वापरास देता येणार नाही. तसेच वापराच्या उद्देशात बदल करता येणार नाही.

११) महानगरपालिकेस आवश्यकता वाटल्यास कोणत्याही वेळी करार संपुष्टात आणून सदरची इमारत ताब्यात घेण्याचां अधिकार राहील.

१२) कोणत्याही विवादामध्ये मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम असेल.

१३) सदरचे केंद्रावर पर्यवेक्षण करण्याचा व सुचना करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे असेल.

१४) संस्थेने केलेल्या कामाचा अहवाल दर ३ महिन्याला सादर करणे आवश्यक आहे.

१५)केंद्राच्या संदर्भाने कुठलीही अनुचित घटना घडल्यास त्यास अहमदनगर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१६)सर्व कर भरण्याची जबाबदारी सदरचे केंद्र चालविण्यास घेणा-या संस्थेची राहील.

१७) प्रस्ताव सदरची जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे कालावधीत सुटीचे दिवस सोडून सकाळी ११.०० ते ५.०० (दुपारी २ ते ३.०० सोडून) या वेळेमध्ये बंद लिफाफ्यामध्ये मा.उपायुक्त (कर), अहमदनगर महानगरपालिका यांचे कार्यालयात बंद पेटीमध्ये सादर करावेत.

आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.